महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४१ वा | दिनांक : २६/०२/२०२५ | वार : बुधवार

## जयंत पाटील - बावनकुळे यांची मध्यरात्री भेट





**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी मध्यरात्री भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याची मोठी बातमी समोर आली आहे. या भेटीमुळे जयंत पाटील हे भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

'टीव्ही ९ मराठी'च्या वृत्तानुसार, जयंत पाटील यांनी सोमवारी मध्यरात्री चंद्रशेखर बावनकुळे यांची त्यांच्या मुंबई स्थित बंगल्यावर भेट घेतली. भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने या दोघांची भेट घडवून आणली. या तिन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेचा तपशील पुढे आला नाही, पण ही भेट जयंत पाटील यांच्या संभाव्य भाजप प्रवेशाभोवती फिरती असल्याचा दावा केला जात आहे.

दुसरीकडे, स्वत: जयंत पाटलांनी आपण चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याचे स्पष्ट केले आहे. पण त्याचवेळी त्यांनी ही राजकीय भेट नसल्याचेही ठणकावून सांगितले आहे. ते म्हणाले, काल सायंकाळी ७.५० वा. त्यांच्या घरी माझी भेट झाली. सांगली जिल्ह्यातील काही महसुली प्रश्नांवर मी काही १०-१२ निवेदने दिली. ही निवेदने देण्यासाठी मी त्यांची वेळ मागितली होती. महसूल विभागात सात बारा ऑनलाईन केलेत. अनेक शेतकऱ्यांचे सातबारा चुकलेत. पण त्याच्या दुरुस्त्या वेळेवर होत नाहीत. हा सर्व महाराष्ट्राचा प्रश्न होता. त्याकडे त्यांचे लक्ष वेधले. अनेक जमिनींना एक्वायर झालेल्या नोटीसी दिल्यात. त्याच्यावर शिक्के मारलेत. पण या जमिनीचे भूसंपादनही झाले नाही किंवा शेतकऱ्यांना त्याचा मोबदलाही दिला नाही. असे आमच्या जिल्ह्यातले विविध प्रश्न होते. यासाठी मी त्यांना भेटलो.

आमची भेट ६ वा. होणार होती. पण त्यांची हिअरिंग बराचवेळी चालली. ६.५० वा. ते त्यांच्या घरी आले. त्यानंतर मी त्यांची भेट घेतली. आम्हा दोघांत २५ मिनिटे चर्चा झाली. त्यात कोणतीही राजकीय झाली नाही. माझ्यासोबत राधाकृष्ण विखे पाटील होते. स्टाफ होता. माझ्यासोबत शिष्टमंडळातील ४-५ जण होते. तुम्हाला मी दिलेल्या निवेदनांचे रेकॉर्डही पाहता येईल, असे जयंत पाटील म्हणाले.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी यांनी या भेटीवर भाष्य केले आहे. ते म्हणाले, आम्हाला टीव्हीच्या माध्यमातून जयंत पाटील व चंद्रशेखर बावनकुळे यांची मध्यरात्री भेट झाल्याची माहिती मिळाली आहे. भाजप नेते तथा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नुकतेच इस्लामपूरच्या दौऱ्यावर गेले होते. तिथे त्यांची जयंत पाटलांशी चर्चा झाली होती. तेव्हाची त्यांची देहबोली बदलल्याची दिसून आली. शरद पवार गटातील नेत्यांकडून होणारा अवमान तथा प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्या कारकिर्दीवर उपस्थित केले जाणारे प्रश्नचिन्ह पाहता त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला असेल. काल ते भेटले असतील तर ही भेट निश्चितच राजकीय दृष्टिकोनातून झाली असेल. अशी कोणतीही शक्यता नाकारता येत नाही. आमची या घटनाक्रमावर करडी नजर आहे.

जयंत पाटील एक मोठे नेते आहेत. त्यांना राजकारणाचाही दांडगा अनुभव आहे. त्यांच्या सारखा मोठा नेता आमच्या पक्षात असेल, तर आनंदच आहे. ते महायुतीमध्ये येणार असतील तर एक घटकपक्ष म्हणून आम्ही त्यांचे स्वागतच करू.

## मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विधिमंडळ समित्या जाहीर



**मुंबई** : महाराष्ट्र मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली असून अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यात महाराष्ट्र विधिमंडळाच्या २०२४-२५ या कार्यकाळासाठी विविध समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समित्यांची नियुक्ती ही मुख्यमंत्री फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि भाजप विधिमंडळ मुख्य प्रतोद रणधीर सावरकर यांच्या संमतीने करण्यात आली आहे.

मंत्रिमंडळात झालेल्या निर्णयानुसार, सार्वजनिक उपक्रम समितीच्या अध्यक्षपदावर पुण्यातील दौंड मतदारसंघाचे भाजपचे नेते राहुल कुल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पंचायत राज समितीच्या अध्यक्षपदावर रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे यांची वर्णी लागली आहे. आश्वासन समितीच्या अध्यक्ष पदावर रवी राणा यांची, तर अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्ष पदी नारायण कुचे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अनुसूचित जमाती कल्याण समितीवर राजेश पाडवी, तर महिला हक्क व कल्याण समितीवर मोनिका राजळे या अध्यक्ष राहणार आहे. इतर मागासवर्गीय कल्याण समितीवर किसन कथोरे, मराठी भाषा समिती पदावर अतुल भातखळकर, विशेष हक्क समितीवर राम कदम, धर्मादाय खाजगी रुग्णालय तपास समितीवर श्रीमती नमिता मुंदडा, आणि आमदार निवास व्यवस्था समितीच्या अध्यक्ष पदावर सचिन कल्याणशेट्टी हे अध्यक्ष म्हणून कारभार पाहणार आहे.

दरम्यान, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कोट्यातील समित्यांचे वाटप अद्याप झाले नाही. विधानसभा अध्यक्षांनी विविध समित्यांच्या संदर्भात नव्या नियुक्त्या सर्व पक्षीयांकडून होत नसल्याने नाराजी व्यक्त केली होती. तर मंत्रिपद हुकलेल्या भाजप आमदारांचे समितीच्या मार्फत राजकीय पुनर्वसन केले जाणार आहे. तसेच या समित्यांचे वाटप महायुतीच्या फॉर्म्युल्यानुसार होणार असल्याचे बोलले जात आहे. विधिमंडळाच्या एकूण २९ समित्या असतात, त्यातील भाजपच्या वाट्याला ११ समित्या आल्याची माहिती समोर आली आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ फेब्रुवारी २०२५


## इंभापा महिला महाविद्यालयात रक्तदान व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबिर




**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी मरणोत्तर नेत्रदान व रक्तदान जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान व मरणोत्तर नेत्रदान हे अत्यंत महत्वाचे आणि प्रेरणादायक उपक्रम आहेत. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची विचारधारा आणि त्यांचे समाजातील योगदान विचारात घेतले असता, अशा शिबिराद्वारे त्यांनी दिलेल्या मूल्यांना समर्पित अशी एक सकारात्मक दिशा दिली जात आहे.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगीरिवार यांनी सर्वश्रेष्ठ दान म्हणजेच रक्तदानाचे अनन्यसाधारण महत्त्व, मरणोत्तर नेत्रदान शिबिरात सहभागी झालेल्या रासेयो स्वयंसेविका आपल्या दृष्टीचे योगदान इतरांना देऊन समाजासाठी एक मोलाचे योगदान देऊ शकतात या संदर्भात मार्गदर्शन केले.

उपस्थित विद्यार्थिनीआणि प्राध्यापकांनी रक्तदान तसेच नेत्रदान करण्याविषयी शपथ घेतली. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये रक्तदान, नेत्रदानाचे महत्त्व आणि त्याचे समाजावर होणारे सकारात्मक परिणाम याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. अंजली उमाळकर, प्रा. विशाखा जोशी यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती विशेष : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ९६ व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन.

**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** : आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, २३ फेब्रुवारीला राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती आहे. त्या निमित्ताने विषय : तुम्हाला गुलामाप्रमाणे राहावयाचे की स्वतंत्र माणसाप्रमाणे जगावयाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९३६ च्या विधानाच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ९६ व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे दिनांक २६ फेब्रुवारी २०२५, बुधवारला राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीनिमित्त दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला सामाजिक कार्यकर्ते एड. अविनाश थिट्टे सर उद्घाटनपर मार्गदर्शन करणार मत्स्योदरी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक भीमराव जाधव, साहित्यीक व लेखक हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे.

तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता ९६ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


# कृषीभुषण डॉ. सिताराम जाधव 'विद्रोही जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड येथील समाजसेवी, सेंद्रिय शेती तज्ञ कृषीभुषण डॉ. सिताराम जाधव यांना दि. २२ फेब्रुवारी रोजी 'विद्रोही जिवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.छ.संभाजीनगर येथे आयोजित अ.भा.विद्रोही मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. समाजसेवी कृषीभुषण डॉ. सिताराम जाधव यांनी कन्नड तालुक्यात सेंद्रिय शेती चळवळ सुरु केली. आपल्या मुरमाड शेतजमीनी वर सेंद्रिय शेती च्या माध्यमातून विविध प्रयोग करीत प्रतिकुल वातावरणात न येणाऱ्या फळ वृक्षांची लागवड यशस्वी केली. जमीन व माणसांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी देशी जाती च्या गाईं चे संगोपन केले. तालुक्यातील शेतकरी, तरुणांना सेंद्रिय शेती चे महत्व पटविण्यासाठी प्रशिक्षण उपक्रम राबविले, वैद्यकीय सेवेच्या माधमातून ही ते अनेकांना मदत, मार्गदर्शन करतात. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेत, अ.भा.विद्रोही मराठी विद्रोही साहित्य संमेलना चे अध्यक्ष डॉ. अशोक राणा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी जेष्ठ साहित्यिक कंवल भारती, जेष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे, विद्रोह सांस्कृतिक चळवळीच्या डॉ. प्रतिमा परदेशी, अर्थातज्ञ डॉ. एच.एम. देसरडा डॉ. प्रतिभा अहिरे, स्वागताध्यक्ष इंजि. सतिश चकोर, राज्यसंघटक कॉम्रेड किशोर ढमाले, ग्रामीण साहित्यिक मा.रा. लामखडे, धम्म प्रचारक तुकाराम गायकवाड, साहित्यिक मधुकर वाकोडे, एम.के.शेख, आंबेडकरी विचारवंत प्रकाश शिरसाठ, डॉ. सूर्यनारायण, राजानंद सुरडकर आदिं सह शेकडो साहित्यिक, विचारवंत, कवी, रसिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ फेब्रुवारी २०२५


## स्वा. सावरकर स्मृतिदिनानिमित्त मरणोत्तर नेत्रदान शिबिराचे आयोजन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आज २५ फेब्रुवारी २०२५ रोजी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृतिदिनानिमित्त मरणोत्तर नेत्रदान शिबिराचे आयोजन केले होते. याप्रसंगी जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील नेत्र शल्यचिकित्सक डॉ. ज्योती कानडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. याप्रसंगी ते म्हणाले की, "नेत्रदान करणे सामाजिक काम आहे. आपल्या नेत्रदानामुळे इतरांना दृष्टी लाभते हे पुण्य कर्म आहे. भारतात दरवर्षी कमीत कमी एक लाख लोक अंध आहेत. परंतु नेत्रदान करणाऱ्यांची संख्या २५००० आहे ही तफावत भरून काढण्यासाठी नेत्रदान ही चळवळ झाली पाहिजे. पुढे येऊन प्रत्येकाने नेत्रदान केले पाहिजे असे आवाहन केले. "

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.छाया दापके म्हणाले की," वस्त्रदान, औषधदान, विद्यादान, यापैकी नेत्रदान ही देखील आज काळाची गरज आहे. नेत्रदानामुळे समाजात अनेक समज गैरसमज आहेत. नेत्रदान करताना डोळे काढले जात नाही तर कार्निया म्हणजे डोळ्यावरील पटल. काढून घेतले जाते. मृत्यूनंतर सहा ते आठ तासाच्या आत हे डोळ्यावरील दृष्टीपटल काढल्यानंतर गरजू अंध व्यक्तींना कार्निया लावून दृष्टी देता येते. कावीळ, कॅन्सर, एचआयव्ही झालेल्या व्यक्ती नेत्रदान करू शकत नाहीत. भविष्यामध्ये तरुण पिढीने पुढे येऊन नेत्रदान चळवळ अधिक प्रभावी करावे असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. बालाजी नगरे यांनी केले. आभार प्रा. मोहन राठोड यांनी मानले. तर सूत्रसंचालन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले.

याप्रसंगी डॉ. सावता फुलसागर, डॉ. स्वाती जाधव, प्रा. डोळे मॅडम, प्रा. आकोसकर मॅडम, प्रा. वाघ मॅडम, प्रा. चौखंडे सर, प्रा. डॉ. वैशाली बोबडे, शासकीय रुग्णालयाचे श्री.गोरे साहेब, आदीसह बहुसंख्य विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

## जैतखेडा येथे प्रयागराज महाकुंभ दर्शन सोहळा संपन्न



**कन्नड (अरुण थोरात):** जैतखेडा ता.कन्नड येथे अनुयायी लोकराज्य महाभियान कन्नड भाग व संभाजीनगर उपविभाग यांच्या वतीने महाकुंभ तीर्थ दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रयागराज कुंभमेळा येथुन आणलेल्या संगमावरील पवित्र जलाचे अनुलोम संस्थेच्या माध्यमातून ग्रामस्थ व भजनी मंडळ यांच्या उपस्थितीत पुजन व तीर्थ प्रसादाचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी कलशाचे टाळ मृदंगाच्या गजरात संपूर्ण गावातुन मिरवणुक काढण्यात आली. त्यानंतर प्रताप पांडे गुरुजी व संजय पांडे गुरुजी यांच्या उपस्थितीत पुजन करण्यात आले. यावेळी तिर्थ पुजन सोहळ्या विषयी अनुलोम जिल्हा अध्यक्ष सुरेश इचे, माजी सरपंच बाळासाहेब राजगुरू, उपसरपंच मुकेश वेताळ, कृष्णा नलावडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी कडुबा दादा वेताळ, सुभद्रा गिरी, लक्ष्मीबाई वेताळ, रुख्मन गिरी, चेअरमन संगीता वेताळ, निर्मला राजगुरू, कांताबाई वेताळ, राणी वेताळ, छाया वेताळ, भामाबाई वेताळ, शिलाबाई वेताळ, मंदा पांडे, आरती पांडे, मंगल पांडे, कोमल वेताळ, गिता राजपुत, लताबाई जाधव, स्वाती वेताळ, रेखा वेताळ, सविता गिरी, चंदा पांडे, कौशल्याबाई वेताळ, बाळु वेताळ, प्रकाश पांडे, राजु गिरी,शिवाजी नलावडे, आण्णासाहेब वेताळ, डॉ महिताप राजपुत, पंढरीनाथ वेताळ, कोंडीराम चव्हाण, जगदीश वेताळ, शिवाजी मोरे, मुलचंद राठोड, काशिनाथ वेताळ, प्रदिप राजपुत, पंकज वेताळ, सोपान वेताळ, ज्ञानेश्वर वेताळ आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी भागजनसेवक संतोष मोकासे व वस्तीप्रमुख कार्तिक राजगुरू यांनी परिश्रम घेतले.

## देवाच्या दारात कुणीही सेलिब्रिटी नसतो - प्राजक्ता माळी



**मुंबई :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर येथे महाशिवरात्रीनिमित्त होणाऱ्या अभिनेत्री प्राजक्ता माळीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला विरोध दर्शवण्यात आला होता. देवस्थानच्या माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी विरोध दर्शवत देवस्थानला पत्र लिहून चुकीचा पायंडा न पाडण्याचे आवाहन केले होते. याबाबत चांगलीच चर्चा रंगली. आता यावर प्राजक्ता माळीने व्हिडिओ शेअर करत थेट उत्तर दिले आहे. देवाच्या दारात कोणी सेलिब्रिटी नाही. सगळे भक्त असतात. त्यामुळे समाजाची दिशाभूल करु नये, अशी विनंती प्राजक्ता माळीने केली आहे. प्राजक्ता माळीच्या या व्हिडिओनंतर त्र्यंबकेश्वरमधील कार्यक्रम होणार असल्याचे देवस्थानचे विश्वस्त मनोज थेट यांनी सांगितले आहे.

महाशिवरात्रीनिमित्त त्र्यंबकेश्वर येथे धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत. सुप्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता माळी आणि सहकलाकार येथे शिवार्पणनस्तु नृत्य सादर करणार आहेत. पण आता या कार्यक्रमाला देवस्थानच्या माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी विरोध दर्शवला आहे. यावर बोलताना हा कार्यक्रम संपूर्णत:: शास्त्रीय-उपशास्त्रीय संगीतावर आधारित असलेल्या नृत्याचा कार्यक्रम असल्याचे प्राजक्ता माळीने स्पष्ट केले.

यंदाच्या महाशिवरात्रीला काय करावे असा विचार मनात घोळत असतानाच मला त्र्यंबकेश्वर मंदिर ट्रस्टकडून फोन आला. त्यांनी सांगितले की, 'दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त मंदिराच्या प्रांगणामध्ये शास्त्रीय-उपशास्त्रीय संगीतावर, नृत्यावर आधारित उत्सव आयोजित करत असतो. आतापर्यंत अनेक दिग्गज कलाकार इथे येऊन आपली कला सादर करुन गेले आहेत. फुलवंतीच्या निमित्ताने आम्हाला कळले की तुम्ही सुद्धा भरतनाट्यम नर्तिका आहात. तर यंदाच्या वर्षी तुम्ही तुमच्या शास्त्रीय नृत्याचा कार्यक्रम सादर कराल का?' अर्थातच सगळ्या नृत्यकर्मीसाठी नटराज ही नृत्यदेवता आहे, आराध्य दैवत आहे. त्यामुळे मी वेळ न दवडता त्यांना तात्काळ होकार कळवला. " असं सांगत प्राजक्ताने या कार्यक्रमासाठी तिला का आमंत्रित केले होते याबाबत स्पष्ट केले.

प्राजक्ता म्हणाली की, मी इथे आवर्जून नमूद करु इच्छिते की महाशिवरात्रीनिमित्त होणारा हा कार्यक्रम संपूर्णत: शास्त्रीय-उपशास्त्रीय संगीतावर आधारित असलेल्या नृत्याचा कार्यक्रम आहे. ज्यांना माहित नसेल त्यांना मी सांगू इच्छिते की मी स्वत: भरतनाट्यम नर्तिका आहे. मी विशारद, अलंकार केलेले आहे. त्यातच बीए, एमए केले आहे. तर अपुऱ्या माहितीमुळे जर कोणाचा गैरसमज झाला असेल तर त्यांनी त्यांच्या मनातील किंतू परंतू काढून टाकावे. समाजाची दिशाभूल करु नये, अशी मी त्यांना विनंती करते, असे म्हणत प्राजक्ताने ललिता शिंदे यांच्या प्रश्नांना त्यांचे नाव न घेता उत्तर दिले.

एक गोष्ट आवर्जून सांगायची की देवाच्या दारात कोणी सेलिब्रिटी नसतो. सगळे भक्त असतात. त्याच भक्तीभावाने मी माझ्या नृत्याच्या माध्यमातून माझी सेवा नटराजाच्या चरणी रुजू करणार आहे. अर्पण करणार असल्याचे प्राजक्ताने सांगितले. म्हणूनच कार्यक्रमाचे नाव शिवार्पणमस्तु असे आहे. वेळेच्या कारणामुळे मी दोनच रचना सादर करणार आहे. बाकी रचना माझे सहकलाकार सादर करतील. मी निवेदन करणार आहे, असेही ती म्हणाली. चेंगराचेंगरी, गर्दीची भीती असेल तर विश्वस्त, पोलिस जो निर्णय घेतील तो सामाजिक भान बाळगत सर्वांवर बंधनकारक असणार आहे. तो सगळ्यांनाच मान्य असणार आहे, असे तिने स्पष्ट केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ फेब्रुवारी २०२५


## महागाई भत्त्यात ३ टक्क्यांची वाढ : राज्य सरकारचा मोठा निर्णय



**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्यामध्ये ३ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ही एक खुशखबरच मानली जात आहे. यानुसार आता महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरून ५३ टक्के करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सरकारच्या वित्त विभागाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी एक शासन निर्णय जारी केला असून, या निर्णयानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात १ जुलै २०२४ पासून सुधारण करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. हा वाढीव महागाई भत्ता १ जुलै २०२४ पासून लागू करण्यात आला आहे. 'एबीपी माझा'च्या वृत्तानुसार याबाबत माहिती देण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या या निर्णयानुसार हा वाढीव महागाई भत्ता फेब्रुवारी महिन्याच्या वेतनात दिला जाणार आहे. अर्थात १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या सात महिन्यांचा वाढीव महागाई भत्ता फेब्रुवारी २०२५ च्या वेतनात थकबाकी म्हणून दिला जाणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या या मागणीला अखेर यश आले असल्याचे दिसत आहे. सध्याची महागाई पाहता सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. शासनाच्या या निर्णयावर सरकारी कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा राज्यातील एकूण १७ लाख शासकीय कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीची सुरुवात करण्यात आली असून फेब्रुवारीच्या वेतनात कर्मचाऱ्यांना वाढीव पगार देण्यात येणार आहे.

एखाद्या कर्मचाऱ्याचा ४० हजार रुपये मूळ पगार असेल तर ३ टक्के वाढीव भत्त्यासह दरमहा १२०० रुपये अतिरिक्त महागाई भत्ता मिळण्यास सुरुवात होईल. ही वाढ जुलैपासूनच लागू मानली जात असल्याने कर्मचाऱ्यांना जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांची थकबाकीही दिली जाणार आहे. अशाप्रकारे त्यांना थकबाकी म्हणून ३६०० रुपयेही मिळतील.

## महाराष्ट्र - कर्नाटक बससेवा लवकरच पूर्ववत होणार



**कोल्हापूर :** कर्नाटक येथील चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या चालकाला मारहाण करण्यात आली होती. या घटनेच्या निषेधार्थ राज्य परिवहन मंडळाने कर्नाटकात जाणाऱ्या बस फेऱ्या बंद केल्या होत्या. यामुळे सीमाभागातील प्रवाशांची गैरसोय होताना दिसत आहे. यावर आता तोडगा काढण्यासाठी व बस फेऱ्या पुन्हा सुरू करण्यासाठी हालचाली सुरू असल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांतील बससेवा पूर्ववत सुरू होण्यासाठी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी व बेळगावचे जिल्हाधिकारी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून चर्चा केली आहे. बस सेवा पूर्ववत सुरू करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि सुरक्षा या विषयांवर दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाली असल्याचे समजते. या बैठकीला कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूरचे पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित तसेच बेळगावचे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन व बेळगावचे पोलिस अधीक्षक डॉ. भीमाशंकर गुळदे उपस्थित होते.

बेळगावचे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी सांगितले की, प्रवाशांच्या सोयीसाठी कर्नाटकची बससेवा महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत सुरू राहील. तेथून पुढे महाराष्ट्राच्या एसटीतून प्रवाशांना अपेक्षित ठिकाणी पोहोचवले जाईल. तसेच दोन्ही राज्यांतील बसवर किंवा कर्मचाऱ्यावर हल्ले करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी स्पष्ट केले.

कर्नाटकमध्ये चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र एसटीच्या चालकावर हल्ला करणाऱ्या कन्नड संघटनेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र पोलिसांनाही अशा घटनांत सहभागी होणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची विनंती करण्यात आल्याची माहिती बेळगावचे जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांनी दिली. दरम्यान, आता दोन्ही राज्यांचे मुख्य सचिव आणि वरिष्ठ पोलिस अधिकारी यांची बैठक झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

## गोविंदा आणि सुनीता आहुजा यांच्या नात्यात दरी?



गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा यांच्या वैवाहिक जीवनात सर्व काही ठीक नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, गोविंदाचे विवाहबाह्य संबंध आहेत, ज्यामुळे ३७ वर्षांच्या लग्नानंतर हे जोडपे घटस्फोट घेणार आहे. तथापि, याप्रकरणी अद्याप दोघांकडूनही कोणतेही अधिकृत विधान जारी केलेले नाही.

झूम टीव्हीच्या वृत्तानुसार, गोविंदाचे एका ३० वर्षीय मराठी अभिनेत्रीसोबत विवाहबाह्य संबंध आहेत. दरम्यान, या जोडप्याच्या घटस्फोटाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

जर गोविंदा आणि सुनीता यांचा घटस्फोट झाला तर त्याला ग्रे घटस्फोट म्हटले जाईल. खरंतर, जेव्हा जोडप्याचे २५ ते ४० वर्षे एकत्र राहिल्यानंतर घटस्फोट होतो तेव्हा त्याला ग्रे घटस्फोट म्हणतात. यांना सिल्व्हर स्प्लिटर असेही म्हणतात. अमेरिका आणि युरोपमध्ये या शब्दाची लोकप्रियता वाढली, परंतु आता भारतातही त्याची चर्चा वेगाने होत आहे.सुनीता आहुजाने अलीकडेच हिंदी रशशी झालेल्या संभाषणादरम्यान खुलासा केला की ती आणि गोविंदा वेगवेगळ्या घरात राहतात. ती म्हणाली, 'आमची दोन घरे आहेत. माझे मंदिर आणि माझी मुले एका फ्लॅटमध्ये आहेत, तर गोविंदा दुसऱ्या फ्लॅटमध्ये राहतो. तथापि, सुनीताने असेही सांगितले की गोविंदा त्याच्या बैठकींमुळे उशिरा येतो आणि त्याला बोलायला आवडते, म्हणून तो तिथेच राहतो.

## 'मसाप'तर्फे कविता दिनाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने गुरुवार, 27 फेब्रुवारी रोजी कवितादिनाचे आयोजन करण्यात आले आहे. सन्मित्र कॉलनीतील डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात हा कार्यक्रम होईल, अशी माहिती मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील यांनी दिली, तर दुसरीकडे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागात कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. दासू वैद्य यांनी दिली.

मराठवाडा साहित्य परिषद गेल्या एकोणचाळीस वर्षांपासून कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस कवितादिन म्हणून साजरा करते. यानिमित्ताने कविसंमेलन, कवितेवर चर्चासत्र, कुसुमाग्रजांच्या कवितांचे अभिवाचन किंवा कवितेच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या कवीस अथवा काव्यसमीक्षकास पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी कविसंमेलन घेऊन कवितादिन साजरा करण्यात येणार आहे.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी श्रीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हे कविसंमेलन होईल. या कविसंमेलनात आल्हाद भावसार, रवी कोरडे, अभय दाणी, कमलेश महाले, ऐश्वर्य पाटेकर, प्रमोद माने, रमेश पवार, प्रेषित सिद्धभट्टी, ललित अधाने, संदीप जगदाळे, मंगेश घोडके, हनुमान व्हरगुळे हे कवी सहभागी होणार आहेत. सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी भाषा व वाङ्मय विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त, विद्यापीठ परिसरातील विविध शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. साहित्य व भाषा व्यवहाराच्या बाहेरही वेगळ्या जाणिवेची कविता लिहिली जात आहेत. काळाला अनुसरून त्यांचे प्रश्न ते कवितेव्दारे मांडत आहेत. आंतरविद्याशाखेतील या कवींची जाणीव व भाषा वेगळ्या स्वरूपाची आहे. या नव्या कवितेचे काही एक दृश्य समोर यावे या हेतूने 'नव्या कविंच्या नव्या कविता' हे कविसंमेलन आयोजित केले आहे, असे मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. दासू वैद्य यांनी सांगितले.

विद्यापीठातील कार्यक्रमाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांच्या हस्ते होणार आहे. 27 फेब्रुवारी रोजी, दुपारी 12.00 वाजता, मराठी विभागाच्या सभागृहामध्ये हे कविसंमेलन पार पडणार आहे. या कविसंमेलनाला काव्यरसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. कैलास अंभुरे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ फेब्रुवारी २०२५


## पहिली राज्यस्तरीय दांडपट्टा अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेत ४१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : पहिली राज्यस्तरीय दांडपट्टा अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा २३ फेब्रुवारी २०२५ कोल्हापूर एकूण सहभागी १४ जिल्ह्यांतील ४१० विद्यार्थी सहभाग नोंदविला होता. यामध्ये धाराशिव जिल्ह्यांनी तृतीय चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावून जिल्ह्याचे नाव लौकी केले.यावेळी दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप लाड, सचिव बाला साठे, खजिनदार गौतम विधाते, सहसचिव अजय शहा , सहखजिनदार महमदरफी शेख, जेष्ठ वस्ताद आनंदराव ठोंबरे, शस्त्र व शास्त्र विशारद आणि लेखक वस्ताद विनायक चोपदार(आबाजी), वस्ताद मनोज बालिंगेकर.दांडपट्टा महाराष्ट्राचे सदस्य सौ दिपाली साठे, महागुरु सुभाष मोहिते, दांडपट्टा इंडियाचे अध्यक्ष संभाजी अहिरराव यांची उपस्थिती होती.या स्पर्धेत उमरगा तालुक्यातील गुरुकुल प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल मुरूम,डॉ. रामानुजन इंग्लिश मीडियम स्कूल उमरगा,कुमार स्वामी विद्या मंदिर उमरगा,शरणप्पा मलंग विद्यालय उमरगा,श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय उमरगा,छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज उमरगा या शाळांनी सहभाग घेतला होता.पहिली राज्यस्तरीय दांडपट्टा अंजिक्यपद क्रीडा स्पर्धेत टिम धाराशिव च्या वतीने मुलीमध्यें स्वरांजली मामले - प्रथम, स्वरा पाटील - प्रथम, पृतुषा प्रविण सोमवंशी - प्रथम, अनन्या मारूती पांगे - तृत्तीय, आरती दिगंबर पांगे - तृत्तीय, अक्षरा गुंडय्या स्वामी - तृत्तीय, समृद्धी संतोष टोपगे - द्वतीय, श्रेया जितेंद्र अंकुशे - तृत्तीय, मुलामंध्ये आयुष्य पवार - प्रथम, रोमन सैनी - द्वतीय, साहील शेख - प्रथम, करण जाणे - तृत्तीय, गोविंद रूपणूर - प्रथम, राजवीर चौधरी - द्वतीय, अभय मोरे - प्रथम यांनी सहभागी होऊन चांगली कामगिरी पार पाडली. जिल्हा संघटनेच्या वतीने यशस्वी अभिनंदन करण्यात आले व विद्यार्थ्यांचा पहिली राष्ट्रीय दांडपट्टा स्पर्धेत निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देण्यात आले या स्पर्धा २१ व २२ एप्रिलमध्ये या तारखे मध्ये लोणावळा पुणे महाराष्ट्र या ठिकाणी आयोजित होणार आहे.

सर्व खेळाडूंचे गुरुकुल प्री प्राइमरी इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापिका सौ मयुरी चौधरी व संस्थेचे सचिव आनंद चौधरी, डॉ. रामानुजन इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापिका गंगा अंबर, संस्थेचे अध्यक्ष महेश अंबर, मलंग विद्यालयाचे मुख्याध्यापक अजित गोबारे, कुमार स्वामी शाळेचे मुख्याध्यापक कविराज रेड्डी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सर्व पालक वर्गातून कौतुक करण्यात येत आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा संघटनेच्या वतीने टेक्निकल विभाग प्रमुख आदिनाथ गोरे यांनी काम पाहिला.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


## महात्मा गांधी व्याख्यानमालेला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा गांधी व्याख्यानमालेचे आयोजन मंगळवार (ता. २५) रोजी करण्यात आले होते. या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुभाष राठोड होते. प्रमुख व्याख्याते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे व श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र गणापुरे, कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. निलेश शेरे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आतिश तिडके, डॉ. विजय सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कुंडीतील रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या सत्राच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व डॉ. मोटे यांचा परिचय डॉ. निलेश शेरे यांनी करून दिला. डॉ. महेश मोटे यांनी महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, महात्मा गांधीजींचे सत्य, अहिंसा सत्याग्रहासंबंधीच्या विचारांचे महत्त्व समजावून सांगितले. महात्मा गांधीजींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, महात्मा गांधीजींनी दिलेला शांततेचा संदेश आजही जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त आहे. अहिंसा ही जगातील सर्वात मोठी ताकद आहे. आज सरकारच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया चा नारा दिला जातो. हा विचार देखील महात्मा गांधीजींनी आपल्या तत्त्वज्ञानामध्ये स्वदेशी, ग्रामस्वराज्य, लोकशाही मूल्य, स्वयंपूर्ण खेडे, इत्यादींच्या माध्यमातून मांडला आहे. याप्रसंगी डॉ. अतिश तिडके यांनी डॉ. गणापुरे यांचा परिचय करून दिला. डॉ. राजेंद्र गणापुरे यांनी महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, महात्मा गांधीजींनी भारतातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी समतेला महत्त्व दिले. एवढेच नव्हे तर समता प्रस्थापित करण्यासाठी कोणतेच काम हे श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते, हा महत्त्वाचा विचार महात्मा गांधीजींनी सांगितला आहे. महात्मा गांधीजींनी विश्वस्ताची संकल्पना मांडली त्या संकल्पनेच्या माध्यमातून आपल्याकडे असलेला अतिरिक्त पैसा जनतेच्या कल्याणासाठी वापरला पाहिजे परंतु अलीकडच्या काळात असे होताना दिसत नाही. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांनी महात्मा गांधी यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी महाविद्यालयाच्या माध्यमातून अशा व्याख्यानमालेचे आयोजन महत्त्वाचे आहे. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून महात्मा गांधीजींचे विचार, त्यांचे आदर्श तत्त्वज्ञान हे विद्यार्थ्यांमध्ये रुजले पाहिजे. त्या विचारांची शिदोरी घेऊन विद्यार्थ्यांनी राष्ट्र उभारणीस आपले योगदान दिले पाहिजे, असे मत व्यक्त केले. प्रा. बालाजी क्षीरसागर, डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. महेश राठोड, उमेश सर्जे, पापा गायकवाड, दिनेश पुदाले, रमेश सर्जे, सिद्ध सुतार आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कीर्ती इटकरी तर आभार प्रा. संगीता मोरे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.